## दिवाणी दावा क्रमांक १०४/२०१५ मधील निशाणी ५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादींनी उपअधिक्षक भूमी अभिलेख, श्रीगोंदा यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात येवुन त्यांच्या मार्फत दावा मिळकतीची मोजणी करणेत येवुन वस्तुस्थीती दर्शक अहवाल सादर करावा यासाठी केला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, दावा मिळकत मौजे पिसोरे बु॥, ता. श्रीगोंदा येथील गट क्रं.१०५/२ मधील १ हेक्टर २३ आर हा दाव्याचा विषय आहे. वादी यांनी दावा हा दावा मिळकत गट क्र.१०५/२ मधील अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी, मोजणीसाठी व निरंतरच्या ताकिद मनाई हुकूमसाठी प्रतिवादीविरुध्द दाखल केला आहे. दावा मिळकत वादींचे खरेदी मालकीची व वारसा हक्काने त्यांचे नावे व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आलेली शेतजमिन मिळकत होती व आहे. दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा पुर्वीचा गट क्र.१०५ होता. सध्या गट क्र.१०५ चे एकुण पाच पोटहिस्से पडलेले आहेत. वादींच्या दावा मिळकतीस गट क्र. १०५/२ असा पोट हिस्सा पडलेला आहे. दावा मिळकत ही वादी व वादी क्र.२ ते ३ चे वडिल सुखदेव यांनी दिनांक ०२/०८/१९९९ रोजी पिंकू उर्फ रुपाली मुनोत व रेणकू उर्फ ज्योती मुनोत यांचेकडून रजिष्टर खरेदीखताने कायमस्वरुपी विकत घेतलेली होती व आहे. प्रतिवादींनी वादींच्या २४ आर क्षेत्रावर अतिक्रमण करुन क्षेत्र बेकायदा कब्जात घेतले आहे. भुमी अभिलेख श्रीगोंदा यांच्या कार्यालयामध्ये दिनांक २३/०३/२०१५ रोजी अर्ज देण्याचा प्रयत्न केला असता संबंधीतांनी संपुर्ण गट क्र.१०५ ची मोजणी करावी लागेल. पोट हिस्स्याची मोजणी करीत नाही. त्या करीता सर्वांची संमती लागेल. ही बाब वादींनी सर्व प्रतिवादींना सांगितली. परंतु त्यांनी ती जुमानली नाही. त्यामुळे सरकारी मोजणी होवून हददीच्या खुणा करुन तसेच प्रतिवादी क्र.१ ते ७ कडून अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेसाठी केलेला आहे. दावा मिळकत वादींची खरेदी मालकीची आहे. म्हणून दावा मिळकतीची मोजणी करण्यात येवुन हददीच्या खुणा कायम करण्यासाठी वादींनी दावा केला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी नि. क्र.१९ वर म्हणणे देवून अर्जास जोरदार हरकत घेतली आहे. प्रतिवादी क्र.८ ते १२ यांना समन्सची बजावणी होवून देखिल ते दाव्यात हजर झालेले नाहीत. त्यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालवण्यात आला.

४. दाव्यातील कागदपत्राचे व अर्जाचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

५. वादी तर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. एन.डी.गवळी व प्रतिवादी क्र.१ ते ७ तर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. एस.वाय.पत्की यांचा युक्तिवाद ऐकला.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ नुसार स्थानिक अन्वेषन करण्याकरीता न्यायालयास आयोगपत्र काढणेचे अधिकार आहेत. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे या दाव्यात उप-अधिक्षक भूमी अभिलेख श्रीगोंदा यांच्याकडून दावा मिळकतीची मोजणी होउन अंतर्गत हिस्स्यांच्या खुणा दर्शवणारा नकाशा जर अभिलेखावर आला तर दाव्यातील वादग्रस्त बार्बीवर आधिक प्रकाश पडेल. त्यामुळे अशा परिस्थितीत कोर्ट कमिशनर मार्फत दावा मिळकतीची मोजणी होउन वस्तुस्थिती दर्शक अहवाल नकाशासह न्यायदानाच्या हितासाठी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१ वादींचा नि.५ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२ उप-अधिक्षक, भुमि अभिलेख, श्रीगोंदा यांना कोर्ट कमिशनर म्हणुन नेमण्यात येते. त्यांनी कमिशनपुर्व नोटीसा सर्व संबंधितांना काढुन दावा मिळकत मौजे पिसोरे बु॥, ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथील गट क्रं.१०५ मधील संपुर्ण क्षेत्राची मोजणी करुन अंतर्गत हद्दीच्या खुणा, बांधाच्या खुणा कायम करुन व दिसत्या परिस्थितीबाबतचा अहवाल नकाशासह दाखल करावा. जर काही अतिक्रमण असल्यास स्वतंत्रपणे नकाशात दर्शवावे.

३ या कामी होणारी कमिशनची फी वादीने उप-अधिक्षक, भुमि अभिलेख श्रीगोंदा यांच्या कार्यालयात परस्पर हा आदेश झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत जमा करावी. त्याकरीता या आदेशाची प्रमाणितप्रत वादींनी सादर करावी. वेगळी यादी पाठविली जाणार नाही याची उप -अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, श्रीगोंदा यांनी नोंद घ्यावी.

४ पुढील तारखेस वादींनी कमिशन फी भरलेबाबत व योग्य ती कागदपत्रे उप-अधिक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडे जमा केल्याबाबत शपथपत्र दाखल करावे.

५ वादीने कमिशन फि भरल्यापासुन ३ महिन्याच्या आत उप-अधिक्षक, भुमिअभिलेख श्रीगोंदा यांनी दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दीच्या खुणा कायम कराव्या. त्यानंतर ३० दिवसाच्या आत मोजणीचा अहवाल नकाशासह या न्यायालयात सादर करावा.

६ या आदेशाचे लेखन खुल्या न्यायालयात निवेदीत करुन आदेश घोषीत केला.

दिनांक -२४/११/२०१५

**(सौ.व्ही.बी.पाटील)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
श्रीगोंदा.